

# प्रतिबिंब

## महिला समस्यांचा आत्मशोध

**" A Mirror Approach to Women's Problems"**


संपादक

डॉ. नीलकण्ठ भुसारी

डॉ. वनिता पोच्छी । डॉ. मिना निकम



अथर्व

# स्त्रियांचे सामाजिक आणि आर्थिक सक्षमीकरण

**– प्रा. उदय श्रीकृष्ण काळे**

वाणिज्य विभागप्रमुख, मे.ए.सो.कला व वाणिज्य महाविद्यालय, मेहकर

**प्रस्तावना**

आजच्या एकविसाव्या शतकात माहिती व तंत्रज्ञानाच्या युगामध्येही समाजात मुला–मुलींमध्ये भेदभाव केला जात आहे. महाराष्ट्र राज्य हे कितीही सुधारलेले किंवा प्रगतीशील जरी असले तरी राज्यामध्येसुद्धा याहून वेगळी स्थिती नाही, हे आपल्या राज्याच्या आकडेवारीवरून स्पष्ट होते. लोकसंख्येमध्ये स्त्री–पुरुषांचे प्रमाण समान नाही म्हणजे स्त्रियांपेक्षा पुरुषांचे प्रमाण अधिक आहे. हा असमतोल निसर्गाने घडविलेला नाही तर लिंगभेद कारणामुळे झालेला आहे. लिंगभेदविरहित मानव विकास खऱ्या अर्थाने साधावयाचा असेल तर स्त्रियांचाही विकास होणे आवश्यक आहे. परंतु त्याकरिता सर्वप्रथम मुलींचे अस्तित्व टिकविणे गरजेचे आहे. म्हणजेच नवजात मुलगी प्रथमत: जिवंत राहिली पाहिजे. नंतर तिचे व्यवस्थित भरणपोषण होऊन तिला मोकळेपणाने वाढू देऊन निवडीचे स्वातंत्र्य दिले पाहिजे. हे स्वातंत्र्य उपभोगण्यासाठी सक्षमीकरणाची गरज आहे. परंतु वास्तव याच्या अगदी उलट आहे. स्त्री म्हणजे 'पुनरुत्पादनासाठी निर्माण केलेली सजीव वस्तू' या दृष्टिकोनातून तिच्याकडे बघितले जाते. तिने लग्न कधी करावे, मुले किती आणि कधी होऊ द्यावी याचा निर्णय कुटुंब आणि समाज घेतो. निर्णयस्वातंत्र्य नसल्यामुळे तिच्या आत्मविकासाचे मार्ग रोखले जातात. तिच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होतो.

स्त्रियांना पोषक आहार न मिळणे, स्त्रियांच्या जननक्षम वयामध्ये असंख्य दडपणे, आरोग्य तपासणीचा अभाव यामुळे जन्माला आलेले मूल जगेल की नाही याची शाश्वती नसते. त्यामुळे अधिक मुलांना जन्म देण्याकडे कल असतो. नवजात शिशू आणि लहान मुलांच्या आरोग्याची चांगली देखभाल होईल अशी व्यवस्था निर्माण झाली तर आई–वडील अनेक मुले होऊ देणार नाहीत. शिक्षणामुळे स्त्रियांच्या क्षमता वाढीला लागतील. चांगले आरोग्य, उपजीविकेचे साधन, कुटुंब, योग्य पाठबळ स्त्रीला मिळाले तर ती समाजाच्या विकासामध्ये भरपूर योगदान करू शकते. सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय क्षेत्रातही ती आपला ठसा उमटवू शकते. किंबहुना या गोष्टी स्त्री सक्षमीकरणाच्या निदर्शक आहेत. स्त्री सक्षमीकरणाच्या अजून काही निदर्शक म्हणजे स्थावर मालमत्तेवर उदा. जमीन, घर यावर तिची मालकी आणि नियंत्रण असणे, कर्ज मिळविण्याची सुविधा, सामाजिक, कामगार संघटनांमध्ये सक्रिय सहभाग तसेच स्थानिक स्वराज्य संस्था ते विधिमंडळ, संसद येथेही तिने अधिकारपदावर असणे. एक नागरिक म्हणून स्त्री सामाजिक योगदान करू शकते, परंतु स्वत:च्या आयुष्याचे निर्णय तिने स्वत: घेणे महत्त्वाचे आहे. म्हणूनच प्रस्तुत शोधनिबंधामध्ये मानव विकासाच्या दृष्टिकोनातून स्त्री विकासाचे मापन करण्याकरिता स्त्री–पुरुषाचे प्रमाण, साक्षरता प्रमाण, स्त्रियांचे कामातील सहभागाचे प्रमाण, स्थानिक स्वराज्य संस्थेतील स्त्रियांचा सहभाग – स्त्री विकास निर्देशांक याची चर्चा केली आहे.

**स्त्री–पुरुषाचे प्रमाण**

राज्याच्या लोकसंख्येतील लिंग गुणोत्तर प्रमाणात होणारी घट, जन्म घेणारी मुलगी कशी उपेक्षित व दुर्लक्षित राहते हे याचे निदर्शक आहे. पण त्याचबरोबर गर्भाची लिंगनिश्चिती करून केले जाणारे गर्भपातही त्यास कारणीभूत आहेत. त्यामागे दोन उद्दिष्टे असल्याचे दिसते. एक म्हणजे छोट्या कुटुंबाची निकड आणि त्याचबरोबर घरात मुलगा जन्माला आलाच पाहिजे ही भावना अधिक प्रभावी ठरल्यानेच असे निर्णय घेतले जातात. राज्यातल्या दूरवरच्या आदिवासी भागात अशा वैद्यकीय सुविधांचा अभाव असल्याने लिंग गुणोत्तर प्रमाण तुलनेने अधिक असल्याचे आढळून येते. त्यामुळेच गर्भलिंग चिकित्सेवर बंदी घालण्याचा निर्णय सरकारने घेतला असला तरी त्याचा नेमका परिणाम काय झाला हे पडताळून पाहण्यात आलेले नाही.

**मुख्यत: काम करणारे लोक आणि त्यातील स्त्रियांचा सहभाग**

नोकरी व्यवसायाला माणसांच्या आयुष्यात महत्त्वाचे स्थान असते. त्यामुळे त्यांना वेगळी ओळख मिळते. नव्या ओळखी होतात. वेगवेगळी कौशल्ये विकसित होतात, पैसे मिळतात; शिवाय राष्ट्रीय उत्पन्नात भर पडते. सर्व स्त्रिया

कोणत्या ना कोणत्या प्रकारचे काम करतात. पण त्यांच्या कामाची दखल घेतली जात नाही किंवा मोजमाप होत नाही. घरातले काम हे संसार चालविण्याचे काम असले तरी ते कष्टाचे असते. उदा. दूरवरून पाणी आणणे, स्वयंपाक करणे, कपडे-भांडी धुणे, साफसफाई करणे, मुलांना वाढविणे यामुळे बऱ्याच पैशांची बचत होते हे खरे, तर या कामांचे पैशात मूल्य होऊ शकते. पण स्त्रियांचे ते नैसर्गिक कामच आहे असे मानून त्यांची आर्थिक बाजू समजून घेतली जात नाही. अनेकदा या पूर्वग्रहामुळे व मोजमाप पद्धतीच्या त्रुटीमुळे स्त्रियांच्या आर्थिक योगदानाची योग्य ती नोंद घेतली जात नाही. कामातील सहभागाचे प्रमाण *(वर्क पार्टिसिपेशन रेट्स)* पद्धतीत पैशाच्या स्वरूपात मोबदला मिळणाऱ्या कामांची नोंद केली जाते. त्रुटी असल्या तरी ही पद्धत उपयुक्त आहे. महाराष्ट्र राज्याच्या ग्रामीण भागातील अनेक स्त्रिया शेतीकामामध्ये गुंतलेल्या आहेत. २००१च्या जनगणना अहवालानुसार ८९ टक्के स्त्रिया शेतीत काम करतात. त्यापैकी ४१ टक्के स्त्रिया कौटुंबिक जमिनीवर कामे करतात तर ४८ टक्के स्त्रिया भूमिहीन शेतमजूर आहेत. याच अहवालानुसार पुरुषांपेक्षा स्त्रिया दुय्यम व किरकोळ स्वरूपाच्या कामात गुंतलेल्या आहेत. तसेच स्त्रियांना कायमस्वरूपी काम न देता नैमित्तिक काम देणे पसंत केले जाते. त्यामुळे त्यांना कधी रोजगार मिळतो तर कधी नाही. राज्याच्या शहरी क्षेत्रामध्ये स्त्रियांचा सहभाग दोन वेगवेगळ्या पातळ्यांवर असतो. शिक्षण न मिळाल्यामुळे किंवा कमी शिक्षण झालेल्या स्त्रिया तळाच्या पातळीवरील विविध रोजगारात गुंतल्या आहेत. दुसऱ्या बाजूला उच्चशिक्षित, व्यावसायिक प्रशिक्षण घेतलेल्या असंख्य स्त्रिया वेगवेगळ्या व्यवसायात हिरिरीने भाग घेताना दिसतात. कामाच्या स्वरूपानुसार काम करणारे लोक आणि स्त्रिया यांच्यामध्ये दोन प्रकारे वर्गीकरण केले आहे. १) मुख्य काम करणारे म्हणजेच कायमस्वरूपी काम असलेले आणि २) सीमांतिक काम करणारे म्हणजे अस्थायी स्वरूपाची कामे करणारे. महाराष्ट्रातील मुख्यत: काम करणाऱ्या स्त्रियांच्या संदर्भात सन १९९१ मध्ये ३९.२८ टक्के व्यक्ती तर २६.६७ टक्के स्त्रिया आणि सन २००१ मध्ये ३६.७८ टक्के व्यक्ती तर २३.९५ टक्के स्त्रिया होत्या आणि मुख्यत: व सीमांतिक काम करणाऱ्या स्त्रियांचा सहभाग ३५.९७ टक्के इतका होता. या विश्लेषणावरून असे निदर्शनास येते की, महाराष्ट्रामध्ये मुख्यत: काम करणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण २००१ मध्ये गेल्या दशकापेक्षा कमी झालेले आहे.

**स्त्रीविकास निर्देशांक व स्त्री सक्षमीकरणाचे मापन**

स्त्री व पुरुष यांच्यातील असमानता समजून घेण्यासाठी त्यांच्यातील परस्परसंबंध ही महत्त्वाची बाब आहे. ही असमानता उघडपणे (व्यक्त) आणि अव्यक्त अशा प्रकारे दर्शविली जाते. उघडपणे दिसणारी असमानता संख्याशास्त्रानुसार स्त्री-पुरुष प्रमाण, स्त्रीभ्रूणहत्या, साक्षरतेचे प्रमाण, मजुरीतील तफावत, जमीन व संपत्तीची मालकी ह्यातील ठळक फरकावरुन उघड होते. अव्यक्त असमानता ही सत्तासंबंध आणि स्तर यामध्ये जखडली आहे. त्याचे मोजमाप करणे अत्यंत अवघड आहे. कुटुंब, रीतीरिवाज, धर्म आणि संस्कृती यामध्ये दिसून येणारी घरगुती असमानता ही सत्तेची असमान विभागणी, संसाधनावरील आणि निर्णय प्रक्रियेवरील असमान नियंत्रण, अधिकार तसेच आत्मविश्वासापेक्षा कामाचे अवलंबित्व, कष्टाचे आणि अन्नाचे पक्षपाती व असमान वाटप यामध्ये परिवर्तीत होते. स्त्री विकास निर्देशांक आणि स्त्री सक्षमीकरण मापन करण्याकरिता स्त्री-पुरुष यामधील असमानता शोधून काढणे, ती कमी करण्यासाठी उपाययोजना करणे, ही राज्य शासनाने केलेल्या कार्यवाहीच्या परिणामकारकतेचे निदर्शक अशी साधने आहेत. राज्यांसाठीचा स्त्री विकास निर्देशांक आणि स्त्री सक्षमीकरण मापन तक्त्यामध्ये दर्शविला आहे. त्यावरून खालील राज्यांनी त्यांच्या स्त्री विकास निर्देशांक आणि स्त्री सक्षमीकरण मापन यामध्ये सुधारणा केल्याचे दिसून येते. थोडक्यात वरील सर्व मुद्यांवरून स्त्री-पुरुषांचे घटते प्रमाण कमी करण्याकरिता, स्त्री सक्षमीकरणाकरिता स्त्री-साक्षरता, सांस्कृतिक, राजकीय क्षेत्रातील सहभागासाठी शासनस्तरावर मोठे व सकारात्मक प्रयत्न केले जात आहे. परंतु त्याबरोबरच स्त्रिांना पुरुषांच्या बरोबरीने काम करता यावे किंवा समाजाचे नेतृत्व करता यावे या दृष्टीने स्त्रियांना प्रशिक्षण देण्याचीसुद्धा गरज आहे.

**संदर्भ**

१) भारताची जनगणना १९९१ व २००१.
२) महाराष्ट्र शासन (२००२), 'मानव विकास अहवाल.'
३) महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २००९-१०.

•••